नि.फौ.ख.क्र.३२५/२०१९ .
सरकार वि. प्रभाकर
निशाणी क्र.२५.

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | :– | **लक्ष्मीदास परसराम वाघाडे** |
| **वय** | :– | ६५ वर्षे, **धंदा** :– मजूरी, |
| **राहणार** | :– | कवठा, ता. सावनेर, जि. नागपूर. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्री.डी.आय.बारस्कर, विद्यमान सहाय्यक सरकारी वकील यांच्यामार्फत**

मी फिर्यादी उज्वला खोब्रागडे व तीच्या पतीला ओळखतो. तसेच मी आरोपी प्रभाकर याला सूद्धा ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. काही वर्षांपूर्वी एका दिवशी आम्ही रस्त्याने जात असतांना पोलिसांनी आम्हाला त्यांच्या घरी बोलावले. पोलिसांनी तेथे लिखापढी केली. त्यांनी आम्हाला सांगीतले की, आम्ही पंचनामा करत आहे, येथे सही करा. त्याप्रमाणे मी तिथे सही केली. इतर कूठलीही कार्यवाही माझ्यासमक्ष केली नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्या दोन्हीवर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकूर मला माहित नाही. सह्यांना अनू.**निशाणी क्र.२६ व २७** देण्यात येत आहे.

**(साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयाणाशी विसंगत साक्ष देत असल्याने विद्यमान सरकारी वकीलांनी उलटतपासात विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात येत आहे.)**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.३१.०७.२०१९ रोजी पोलिस आमच्या गावी आले होते, त्यावेळी पावसाळ्याचे दिवस होते, पोलिसांनी मला व सचिन नारनवरे यांना लिखीत नोटीस देऊन फिर्यादीच्या घरी बोलावले होते. हे मला माहित नाही की, त्याआधी दिवाकर खोब्रागडे व प्रभाकर खोब्रागडे यांच्यामध्ये भांडण झाले होते व प्रभाकरने दिवाकरच्या डोक्यावर लोखंडी रॉड मारल होता, त्यावेळी दिवाकरच्या घराच्या भिंतीचे काम सुरू होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी त्यावेळी मारहाण झालेले ठिकाण पोलिसांना दाखवत होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी त्याप्रमाणे त्या घटनास्थळाची माहिती नोंदविली, सदर माहिती आम्हाला वाचून दाखवली व ती बरोबर असल्याने आम्ही त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याचदिवशी मारहाण झालेला लोखंडी रॉड प्रभाकर खोब्रागडे याने काढून दिला व तो पोलिसांनी

आमच्या समक्ष जप्त केला, त्याचा पंचनामा नोंदवला, तो आम्हाला वाचून दाखवला व आमची सही घेतली.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे – श्री.सी.बी.सरोदे वकील यांच्यामार्फत</u>**

**३.** नाकारला.

फेरतपास काही नाही**.**

श्रवणोत्तर स्विकृती
समक्ष

दिनांक –०६.०८.२०२४.

(श्रीमती एन.व्ही. रणवीर)
२ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
सावनेर.